त्वरीत

जा. क्र. माध्य-३/१४/नमाशा/मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
यांचे कार्यालय
दिनांक:- 8 AUG 1990.

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र आरोग्य मंडळ,
हडपसर पुणे-२८

विषय:- १९९०.९१ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत......

संदर्भ:- शासन पत्र क्र. एसएसएन-१०९०/२२६५/माशि -१
दिनांक:- १३.७.९०

शासनाचे संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद म्हणून खालील दर्शविलेल्या ठिकाणी माध्यमातून विना अनुदान तत्वावर/~~[illegible] विना अनुदान~~ तत्वावर " विशेष बाब" म्हणून जून १९९० पासून नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास, अनुदान संहितेच्या नियमानुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील नमूद केलेल्या विशेष अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

विशेष अटी:-

अ] या नविन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन-१०८८/१६६७एन/ माशि-१ दि. १०. २. ८९ अन्वये विहित केलेल्या नविन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमांच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यांत येणार नाही वा आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ इ.बी.सी. च्या ] फीच्या परताव्याची मागणी करण्यांत येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांना मागवून घेऊन कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

इतर अटी:-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० या दोन्ही अधिनियमाखाली नोंदणे आवश्यक आहे.

२.........

For Maharashtra Arogya Mandal
Joint Secretary

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

ह्या बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असली तरी दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजले जाईल.

| अ.नं. संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| १] महाराष्ट्र आरोग्य मंडळ, हडपसर पुणे-२८ | महंमदवाडी तरवडेवस्ती ता. हवेली | आठवी | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियम ३.१. नुसार शाळा सुरू झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करावा.

तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची कार्यपध्दती मधील नियम २८ मधील १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे मुदतीत व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रतीवर मा.शि.उ.सं. यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ करिता

प्रतिलिपी:- शिक्षणाधिकारी [माध्य.] जिल्हा परिषद -पुणे------ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता अग्रेषित......

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सदर नविन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-याकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायासह तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रतिलिपी:- मा. अवर सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांना त्याचे वरील संदर्भीय पत्रान्वये माहितीस्तव सादर.

प्रतिलिपी:- मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांना माहितीसाठी सादर....

आवक क्रमांक ७६४.....
तारीख ११।८।९०..



महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे

# डॉ. दादा गुजर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालय

तरवडेवस्ती, महंमदवाडी हडपसर, पुणे - 411060.
email : dadagujar.secondary@gmail.com फोन : 020-26970552



मान्यता क्र. एस्. एस्. एन्. / 2265 मा. शि. 1
Pay Unit Code No. PNA-571
संस्था कोड : 272517SC003

स्थापना 22 जून 1992
S.S.C. Code No. - 1105040
H.S.C. Code No. - 1115049
UDISE - 27251700311

जा. क्र. 109

दिनांक : 28/10 / 2023

## * हमीपत्र *

मी देविदास महारु पाटील अशी हमी देतो की, शाळेची मान्यतेची काही कागदपत्र मुळ नाहीत ती झेरॉक्स आहेत. परंतु ती खरी आहेत मुळ कागदपत्र संस्थेत आहेत. त्या मुळे झेरॉक्स प्रती स्कॅन केल्या आहेत.

आपला विश्वासू

मुख्याध्यापक
डॉ. दादा गुजर माध्यमिक विद्यालय
महंमदवाडी, पुणे ६०.